PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक
# विशेषांक

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-२)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●
डॉ. युवराज धबडगे, मराठी विभागप्रमुख
प्रा. नागेश बोन्तेवाड, मराठी विभाग
दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

● संपादक मंडळ ●
डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय सांभाळकर
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : ३०० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani


| | | |
|---|---|---|
| 33. | आंबेडकरी शाहीर : वामनदादा कर्डक<br>- प्रा. सौ. नंदा निवृत्ती मास्कर | 135 - 137 |
| 34. | वामनदादा कर्डक यांच्या गीतरचनेतील शैलीविशेष – गेयता<br>- डॉ. जया जितेंद्र कदम | 138 - 141 |
| 35. | महाकवी वामनदादा कर्डक : आंबेडकरी तत्वज्ञानाचा काल-आज व उद्याचा चेहरा<br>- प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 142 - 145 |
| 36. | लोककवी वामनदादा कर्डक यांची स्त्रीगीते<br>- डॉ. देवमन दत्तुजी कामडी | 146 - 155 |
| 37. | वामनदादा कर्डक यांची गझल रचना<br>- डॉ. सुखदेव इधारे | 156 - 159 |
| 38. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकर दर्शन<br>- प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण | 160 - 166 |
| 39. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- डॉ. राजाराम अं. झोडगे | 167 - 170 |
| 40. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या काव्यातील सामाजिक बांधिलकी : शोध व स्वरूप<br>- प्रा. निखिल भिकाजी उंबरकर | 171 - 173 |
| 41. | तुकोबांच्या कुळातील लोककवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये | 174 - 178 |
| 42. | आंबेडकरी चळवळीचा तेजोमय दीप<br>- प्रोफेसर डॉ.शैलेश विश्वनाथ त्रिभुवन | 179 – 181 |
| 43. | आंबेडकरवादी लोकशाहीर वामनदादा कर्डक<br>- प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना | 182 - 184 |
| 44. | लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते<br>- प्रा. डॉ. विलास खुणे | 185 - 187 |
| 45. | शोषितांचा हृदयस्पर्शी आवाज : महाकवी वामनदादा कर्डक<br>- प्रा.डॉ. संबोधी एम. देशपांडे | 188 - 191 |
| 46. | लोककवी वामनदादा कर्डक यांची राष्ट्रीय कविता<br>- प्रा.डॉ. विश्वास शं. पाटील | 192 - 194 |
| 47. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजीकता<br>- डॉ. रंजना मधुकर कदम | 195 – 200 |
| 48. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा.डॉ.साहेबराव भानुदासराव शिंदे | 201 – 204 |
| 49. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांचे स्वरुप आणि विचार<br>- प्रा.डॉ. चंद्रशेखर निवृत्ती एंगडे, प्रा. संजय नामदेवराव आठवले | 205 - 210 |
| 50. | वामनदादा कर्डक यांच्या गीतांतून आलेले डॅ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी विचार<br>- डॉ. गणेश मोहिते | 211 - 214 |


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# तुकोबांच्या कुळातील लोककवी: वामनदादा कर्डक

**- प्रा. डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये**
इंग्रजी विभाग
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि.परभणी, महाराष्ट्र
संपर्क: 9158064068
Email ID: jayvithal@gmail.com

---

महाराष्ट्र तसा मुळातच क्रांतिकारी आणि लढवय्या लोकांचा मध्य भारतातील सुपिक प्रदेश संघर्ष करणे आणि प्रस्थापित, पिळवणूक करणाऱ्या व्यवस्थेला आव्हान देऊन ती उलथवून टाकण्याचे कार्य महाराष्ट्रातील अनेक क्रांतिकारी महापुरुषांनी केले आहे अगदी सोळाव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज यांनी बलाढ्य अशा आदिलशाही, मुघलशाही आणि कुतुबशाही यांच्याशी लढा उभारून मराठी माणसाचे स्वतंत्रएक नवसाम्राज्य उभे केले. त्याच काळात येथील प्रस्थापित व्यवस्थेत वारकरी संप्रदायिक कीर्तनाच्या माध्यमातून लोक प्रबोधन करण्याचं क्रांतिकारी कार्य संत तुकारामांनीकेले. तत्कालीन समाज व्यवस्थेने ब्राह्मणेत्तरांना क्षुद्र समजून लेखन करण्याचा अधिकार नाकारलेला असतांना "वेदांचा तो अर्थ आम्हाशीच ठावा क्ष् येरांनी वहावा भार माथा क्ष्क्ष्" अशा प्रकारचे क्रांतिकारी अभंग लिहून तत्कालीन प्रस्थापित आणि तथाकथीत व्यवस्थेला आव्हान देण्याचे कार्य संत तुकारामांनी केले त्याचबरोबर तूकोबांनी भजनकीर्तन, वारी आदि माध्यमातून समाजप्रबोधनाचे मूलगामी कार्य केले. सर्व कष्टकरी बहुजन समाज पूजा-अर्चा, विविध धार्मिक विधी, कर्मकांड आदी मानसिकतेने ग्रासलेला असतांना तूकोबांनी"तीर्थी धोंडा पाणी क्ष् देव रोकडा सज्जनी क्ष्क्ष्" असे परिवर्तनशील अभंग लिहून परंपरावादी सामाजिक मानसिकतेला वेगळा विचार करायला भाग पाडले. काळ्या आईची सेवा करणाऱ्या काळ्या लोकांचा काळा देव म्हणजे पंढरीचा पांडुरंग त्याच्या नावाने काळा बुका भाळी लावून तूकोबांनी येथील विचारपडीक जमीन आपल्या धारदार शब्दांनी नांगरली आणि तिच्यावर प्रबोधनाचा, नवविचारांचा बगीचा फुलविण्याचे महान कार्य केले. अगदी याच न्यायाने आधुनिक, स्वतंत्र भारताच्या इतिहासात सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक, राजकीय, आर्थिक, बौद्धिक आणि धार्मिक क्षेत्रात महान क्रांती करून सर्वसामान्य, वंचित, पिडीत, शोषित लोकांना मुख्य प्रवाहात सामील करून घेणारी अशी महान क्रांती करणारे, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अभिजनांच्या विरोधातील हुंकार आणि बहुजनप्रतीपालक विचार, नेतृत्व आणि कर्तृत्व सामान्य लोकांपर्यंत पोहचविण्याचे अतुलनीय कार्य लोककवी वामनदादा कर्डक यांनी आपल्या कवितेद्वारे विसाव्या शतकात केलेले दिसून येते.

लोककवी वामनदादा कर्डक म्हणजे एक चालते-बोलते बहुजन प्रबोधनाचे जणू विद्यापीठच! ज्याप्रमाणे विठ्ठल भक्ती जगद्गुरू डिग्री तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या घराघरांत पोहचवली त्याचप्रकारे

वामनदादांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र जनक्रांती महाराष्ट्रातील वंचितपिडीत-शोषित जणांपर्यंत पोहचवली. म्हणजे वामनदादा जणू बाबासाहेबांचे तुकारामच

विठ्ठल सुखा| विठ्ठल दुखा || तुकया मुखा| विठ्ठल ||

या वारकरी संप्रदायाच्या न्यायाने वामन दादा कर्डक यांच्या शब्दाशब्दांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या क्रांतीचे निखारे खचाखच भरलेले दिसून येतात.

क्रूर कठोर तळाशी जरी गाठ होती माझी
भीम माझ्यामधी होता, मान ताठ होती माझी
आज माझ्यातला भीम इथे मी केला उणा
दोष देऊ कुणा, दोष देऊ मी कुणा ?

असे गीत लिहून वामन दादा संत तुकारामांच्या विठ्ठलाप्रमाणे डॉबाबासाहेब आंबेडकर कसे माझे पाठीराखे आहेत याचे प्रतिपादन करतांना दिसतात, परंतु वामन दादांचा विद्रोह हा तुकाराम महाराजांसारखाच प्रखर पहायला मिळतो त्याचे कारण म्हणजे दोन्ही कवींचा कालखंड आणि राजकीय परिस्थिती. पारतंत्र्य काळात तुकोबा चातुर्वर्ण व्यवस्थेला छेद देत असतांना आपले काव्य सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करत होते, आणि वामनदादा स्वातंत्र्य काळात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष आणि लोकजागृतीचे काम करत होते दोन्ही लोककवींना अनुक्रमे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचा भक्कम पाठींबा लाभला, परिणामी ते आपलं मत परखडपणे आणि रोखठोक व्यक्त झाले.

महाराष्ट्राच्या मातीत रूजलेली, येथील जनमनात सतत दुमदुमत असलेली , टाळमृदंगाच्या नादात निनादत असलेली जगद्गु डिग्री संत तुकाराम महाराजांची पाच हजारांच्यावर अभंगवाणी आणि लोककवी वामन दादा यांची "वाटचाल", "मोहोळ", आणि "माझ्या जीवनाचं गाणं" या तीन पुस्तकातील जवळपास पाच हजार गाणी किंवा लोकगीतं हि सर्व सामान्य माणसांच्या बोलण्यातून सहजच उच्चारली जातात तुकोबांचे अभंग मराठी माणसाचं जगणं झालेले असून संतसाहित्याचे अभ्यासक आणि जेष्ठ विचारवंत डॉ.सदानंद मोरे तुकोबांच्या अभंगाविषयी त्यांच्या"तुकाराम दर्शन" या ग्रंथात लिहतात, "तुकोबा हे मराठीत मुरून एकजीव झालेले कवी होत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर किंवा आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या वर्तमानपत्रांची शीर्षवाचने असोत, कि पु.ल.देशपांड्यांचे"तुझे आहे तुजपाशी" किंवा गौरी देशपांड्यांचे"दुस्तर हा घाट" अशी नाट्यकादंबऱ्यांची नवे असोत, शब्द मागयाचेच तर ते तुकोबांनाच मागावेत" म्हणजेच तुकोबा हे येथील दैनंदिन जगणं झालेलं असतांना लेखकांच्या नवीन कलाकृतींना शिर्षाकांसाठी म्हणं सुद्धा झालेले दिसून येतात अगदी याच न्यायाने स्वातंत्र्य काळात वामनदादा कर्डकांची कविता लोकांचे श्वास होऊन त्यांना संघर्ष करण्यास प्रेरित करतांना दिसतेजवळपास चार दशकं वामनदादांची गीतं येथील जनमानसाच्या मनावर गारुड करतात या अनुषंगाने जेष्ठ आंबेडकरवादी लेखक, समीक्षक डॉ.गंगाधर पानतावणे सर त्यांच्या "वादळाचा सांगाती" या निबंधामध्ये दादांच्या गीतांची शैली आणि भाषा याचे समीक्षण करतांना लिहतात, "वामनरावांची गीते कुठेच नटत नाहीत, मुरडत नाहीत. म्हणूनच बाबासाहेब आणि बुद्धांचा विचार ते लोकांच्या भाषेतून लोकांना सांगतात, त्यात कमालीचे गांभीर्य असतं. तळठाव घेण्याचे सामर्थ्य असते." एक वारकरी चळवळीचा संतकवी आणि दुसरा आंबेडकरी चळवळीचा धारकरी! दोन्ही कवींचा आणि त्यांच्या कवितांचा विचार केला असता दोघांचेही लक्ष एकच दिसून येते. दोघांची कविता जनमानसांच्या मनावर अधिराज्य करतांना दिसून येते तुकाराम महाराजांचे चरित्रकार महिपती तुकोबांविषयी लिहितात,

शुद्र याती निश्चित |
जन्माला तुकाराम वैष्णव भक्त ||
जो जगद्गुरू मूर्तिमंत विश्व उद्धारार्थ अवतरला||

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

या अभंगातून तुकाराम महाराजांच्या तत्कालीन काळातील मर्यादा स्पष्ट होतात तरीपण महिपती तुकाराम बाबांच्या येण्याचं महत्व प्रतिपादन विशद करून त्यांचं विश्व उद्धार हेच कार्य कसं महान आहे हे स्पष्ट होते, आणि दुसरीकडे वामनदादा कर्डक हे डॉ.बाबासाहेबांच्या येण्याचं महत्व पटवून देतांना लिहतात,

उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे
काल कवडीमोल जीणे वामनचे होते
आज जुळे जगताशी प्रेमाचे नाते
बुद्धाकडे जग हे वळे, भीमा तुझ्या जन्मामुळे

वरील दोन्ही कवींच्या ओळीचच्या अर्थाचे अवलोकन केल्यास एक बाब प्रकर्षाने समोर येते ती म्हणजे जगद्गु डिग्री तुकोबाराय आणि वामन दादा कर्डकांचे शब्द हे फक्त आणि फक्तयेथील मानव जातीचा उद्धार कसा होईल यासाठीच कागदावर उतरतात आणि जनमानसात सुगंधासारखे पसरतात

संत तुकोबाराय आणि वामनदादा कर्डक यांच्या अभंग आणि गीतांची तुलना करणे थोडे कठीण काम आहेकारण दोघांची भूमिका हि भिन्न आहे मात्र दोघांमध्ये काही साम्य आढळतात ते म्हणजे दोन्ही लोककविंना येथील सामान्य माणूस जागा करायचा आहे.

आता जागा रे भाई जागा रे | चोर निजल्या नाडूनी भागा रे ||
कैसे असोनी ठाउके नेणां | दुःख पावाल पुढिले पेणा ||
आता नका रे भाई नका रे | आहे गाठी ते लुटवू लोकां रे||

हा जगद्गुरू तुकोबांचा अभंग वाचल्यानंतर तुकोबा हे कसे जन उद्धार करण्यासाठी फक्त अभंग रचत नाहीत तर स्वतःच्या घरातील कर्जखते इंद्रायणी नदीमध्ये बुडवून कृतीशील समाजसुधारकांचे कार्य करताना दिसतात. लोकांना जागे करण्याचे महान कार्य तूकोबांनी केलेले असतांना त्यांचे अभंग हे लोकांना अहोरात्र विचार करायला भाग पाडतात. अगदी याच न्यायाने आधुनिक काळात वामनदादा कर्डक आपले परखड गाणे लिहून खंत व्यक्त करतांना दिसतात. येथील आंबेडकरी विचारवंतांना जागे करण्यासाठी वामनदादा लिहितात,

भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते |
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते ||
सद्भाव एकतेचे जर अंतरात असते |
तुटले कुणीच नसते सारेच एक असते ||
वामन, समान सारे स्वार्थाने अंध नसते |
तुझिया नीतीप्रमाणे सारेच नेक असते ||
भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते |
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते ||

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

या गीतातून लोककवी वामनदादांनी येथील मृतप्राय, क्षीण होत चाललेल्या आंबेडकरी चळवळीविषयी खंत, दुःख व्यक्त केलेले दिसून येते. असं म्हटलं जातं कि एखाद्या विचारवंताचे अनुयायीच त्याच्या विचारांची पायमल्ली करत असतात त्या अनुषंगाने वामनदादा अगदी विषन्न होऊन लिहतांना दिसतात. जसा काळ बदलला तशी मुल्ये आणि मापदंड बदलली. स्वातंत्र्यानंतर दोन दशकांनी माणूस हा स्वार्थी आत्मकेंद्री झाला. चळवळ, क्रांती हे शब्द कुणीही वापरून त्याचा गैरवापर सर्वत्र होतांना दिसून येत आहे याचा प्रचंड तिटकारा येऊन कवी विषन्न होऊन वरील ओळी लिहितो आहे.

सामान्य माणसांना जागविण्याचे महत्कार्य करतांना संत तुकोबाराय जगण्याचे तत्वज्ञान काही अभंगातून सहज पण पचायला-रुचायला अवघड असे दृष्टांत देऊन जीवन पटवून देतांना दिसतात एका अभंगात तुकाराम महाराज आपल्या पत्नीला उपदेश करण्याच्या बहाण्यातून कसे सिद्धांत पटवून देतात ते बघा,

मढे झाकुनिया करिती पेरणी | कुणबियाची वाणी लवलाहे ||

तयापरी करा स्वहित आपुले | जयासी फावले नरदेह ||
ओटीच्या परिस मुठीचे ते वाढे | या परी कैंवाडे स्वहिताचे ||
नाही काळ सत्ता आपुलिये हाती | जाणते हे गुंती ऊगवती ||
तुका म्हणे पाही आपुली सुचना| करी तो शहाणा मृत्युलोकी ||

संत तुकारामांचा हा कृषिविषयक अभंग वेळेचे महत्व आणि येथील संस्कृतीचा कणा असलेला शेतकरी कसा अविरत काम करत शेती हेच आपले जगणे-मरणे समजून जगत असतो हे कथन करतो. शेतीच्या आड तुकोबा वाचकांना स्वहित करण्याचा उपदेश करतात. अनंत जन्मानंतर माणसाला दुर्मिळ असा नरदेह लाभला असतांना, या साधनाच्या द्वारे ईश्वर आपलासा करून अत्मोद्धार करून घ्यावा आणि जीवन सार्थकी लावावे हा त्यांचा सरळ उपदेश. काळाची सत्ता हि आपल्या हाती नसून आपण त्वरित शहाणे होऊन मृत्युलोकि जगणे सार्थक करावे असे तुकारामांना वाटते अगदी वामनदादा सुधा आपल्या "तुफानातले दिवे" या कवितेतून जीवनाचे संघर्ष तत्वज्ञान मांडतात

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफान वारा पाउस धारा मुळी न आम्हा शिवे
हल्ल्यावरती होती हल्ले अभंग आमुचे बालेकिल्ले
असाच ताठर माथा आमुचा जरा न खाली लवे
हाय बिचारा दुबळा वारा निर्दयतेने करितो मारा
ह्या वाऱ्याने मावळणारी जात आमुची नव्हे
....
जळू परंतु धरती उजळू प्रकाश येथे असाच उधळू
सदा चांदणे सुखी नांदने हेच आम्हाला हवे
तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

ज्याप्रमाणे संत तुकोबांचे अभंग लोकप्रिय म्हणी, प्रेरणा गीत, मनोविश्लेषण, दिशादर्शक यासाठी सामान्य जन उपयोगात आणतात अगदी त्याप्रमाणे वामन दादांची अनेक गीतं सर्वत्र प्रेरणा गीत, जीवन मार्गदर्शक म्हणून वेगवेगळ्या कार्यक्रमात नियमित वापरले जाते. वरील गीत असो कि, "केस माझे जेंव्हा गळू लागले, तेंव्हा जीवन मला हे कळू लागले" यासारखी लोकप्रिय गीतं सर्वसामान्य माणसं, व्याख्याते आपल्या दैनंदिन जीवनात आणि व्याख्यानात संदर्भ म्हणून वापरतात वामन दादांची गाणी म्हणजे डॉ बाबासाहेबांच्या क्रांतीने ज्वालाग्रही झालेली ज्वालाच डॉ आंबेडकरांची संपूर्ण क्रांती घराघरांत आणि जनमनात पोहचवून जनक्रांती उभारण्याचे महत्कार्य वामन दादांनी केले वामन दादांनी सुद्धा जवळपास पाच हजार वेगवेगळया प्रकारची गाणी लिहून समाजमन ढवळून काढण्याचे काम केले.

शेवटी, संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे सिंहावलोकन केले आता त्यांचे अभंग हे येथील मातीत रुजून त्याचे कणीस झाले आहे आणि भावनिक, वैचारिक, अध्यात्मिक भक्तिमार्गाची भूक भागविण्याचे हे महान लोकोद्धाराचे कार्य सिद्धीस गेले आहे. अनावर झालेली वाचा तूकोबांनी नामाचा छंद घेऊन आपली इप्सित ध्येय्य तडीस नेण्याचे कार्य केले आहे. याचा परिपाक म्हणजे तुकोबा हे केवळ संत प्रबोधन परंपरेचे भूषणच नाही तर वारकरी संप्रदायाचा कळस ठरले संत तूकोबांनी आपल्या अभंग भाषेने येथील सामान्य माणूस त्यांच्या प्रेमाने द्रवला आणि संत तुकाराम म्हणजे आपला सखा, मित्र, बंधू किंवा एक जवळचा माणूस म्हणून प्रेमाने तुकोबा या एकेरी नावाने कुटुंब सदस्य झाले येथील रंजल्या-गांजल्यांना पोटाशी धरून त्यांचे अश् डिग्री पुसणारा महान विचारवंत कवी म्हणजे तुकाराम! आलेले कटू-गोड अनुभव लोकांना वाटून रानभरी झालेले जग योग्य मार्गावर आणण्याचे जीवनकार्य तूकोबांनी करून दाखविले सुमारे साडेचारसे वर्ष उलटून गेले असतांना तुकोबांच्या अभंगाचे गारुड येथील जनमानसांच्या मनावर अधिराज्य गाजवतांना पहायला मिळते म्हणूनच "तुका सर्वश्रेष्ठा प्रिय आम्हा थोर होऊन" दैनंदिन सुख-दु:खात तुमचे माझे अश्रु पुसण्याचे काम महाराज रात्रंदिवस युद्धाच्या प्रसंगी आपली साथ देतांना नित्य अनुभूती देत असतात अगदी याच न्यायाने वामनदादा कर्डक लोकोद्धाराची भाषा बोलतांना दिसतात. त्यांचे गाणे हे मात्र

अलीकडचे असून येथील दिन-दलित, शोषित, पिडीत आणि वंचित लोकांचं प्रबोधन करतांना दिसते. हेच प्रबोधन "भगवे तरी श्वान | सहज वेश त्याचा ||" किंवा "नवसे कन्या-पुत्र होती | तरी का करणे लागे पती ||" असे जळजळीत अभंग लिहून तुकोबांनी येथिल रूढीवादि लोकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालून केले दिसते हिच समाजोद्धाराची तळमळ वामन दादांनी सुद्धा आपल्या गीतांमधून प्राकट केलेली दिसून येते. याच अनुषंगाने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री सुशीलकुमार शिंदे हे वामन दादांच्या मृत्यूच्यावेळी शोकसंदेशात म्हणतात "आंबेडकर चळवळीचा आवाज बुलंद करणारे वामन दादा म्हणजे शाहिरी परंपरेचा वारसा चालवणारे सच्चे कलावंत होते. कष्टकरी, कामकरी, दलितांचे प्रश्न त्यांनी शाहिरी द्वारे सर्वसामान्यापुढे कळकळीने मांडले बुद्ध, फुले आणि आंबेडकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा अत्यंत प्रभावीपणे लोकांपुढे तेवढ्याच कळकळीने आणि तळमळीने सादर केले." एकूणच संत तुकाराम आणि वामन दादा कर्डक यांच्या अभंग आणि गीतांचा विचार क डिग्री जाता असे दिसून येते कि, काळ, परिस्थिती आणि वैचारिक बैठक इत्यादी बाबींमध्ये साधर्म्य लावणे कठीण असले तरी दोन्ही कवींचा विचार हा येथील प्रबोधन, विचार, आणि चळवळ सामान्य माणसांपर्यंत कशी जाईल आणि शेवटचा घटक कसा मुख्य प्रवाहात येईल याच अनुषंगाने त्यांची तळमळ पहावयास मिळते. तसे पहिले तर मग जगद्गु डिग्री तुकोबाराय हे वामन दादांचे गुरूच ठरतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही म्हणूनच वामन दादा कर्डक हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांची लोक चळवळ महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्यांमध्येनेऊ शकले याचे कारण म्हणजे येथील जनमानस हे संत विचाराने आणि अभंगाने नांगरून निघाले होते

बुडते हे जन न देखवे डोळा |
येतो कळवळा म्हणोनिया ||

असे तुकोबांचे सहज, सोपे अभंग येथील लोकांच्या ओठांवर असल्यामुळे पडीक पडलेल्या अशा सुपीक महाराष्ट्र भूमीमध्ये वामन दादांच्या गीतांनी येथे पुन्हा सिंचन करून नवविचारांची रुजुवात करण्याचे महान क्रांतिकारी काम केलेसर्व संतांच्या संत परंपरेतील अभंगाने येथील लोकांना अभंग आणि गाण्याची चांगलीच ओळख झालेली होतीयाच अनुषंगाने वामन दादा एक गीत लिहितात,

माणसा इथे मी तुझे गीत गावे,
असे गीत गावे, तुझे हित व्हावे.
एकाने हसावे, लाखाने रडावे,
असे विश्व आता इथे ना उरावे

अशी तत्वविचार बैठक असणारी गीतं आणि आणि वामन दादांचा शाहिरी बाणा यामुळे त्यांचेगाणे अभंगासारखीच लोकमनाची कास धरू शकले. आपण कसे तुकोबांच्या सर्वसामान्य लोकोद्धारक चळवळीचेच एक अंग आहोत हे वामन दादांनी आपल्या गीतांमधून दाखवून दिले आहे आणि म्हणून वामन दादा हे संत तुकाराम महाराजांच्या कविकुळातीलच एक आधुनिक लोककवी आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भसूची:**


१. मोरे, सदानंद. तुकाराम दर्शन, सकाळ पेपर्स प्रा.लि. पुणे, २०१४.

२. भुकेले, शिवाजीराव. तुका झालासे कळस, राज प्रकाशन, कोल्हापूर, २००८.

३. इंगोले एम.डी.आणि इतर (संपा.), आंबेडकरवादाचा भाष्यकार महाकवी वामनदादा कर्डक, अनुराधा प्रकाशन, नांदेड २०१४.

४. कर्डक, वामनदादा. मोहोळ, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani